## विभागीय निवड समिती. नगर पालिका प्रशासन,आयुक्त कार्यालय,नागपूर

### नगर परिषदांमध्ये राज्य संवर्गातील श्रेणी – ब रिक्त् पदे सरळसेवेने भरण्याबाबतची जाहीरात.

### क्रमांक.एमयुएन १९(१) /कावि-६४/२०१६. दिनांक १७/०५/२०१६

**जाहिरात क्रमांक १/२०१६**
**अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक २८/०५/२०१६**
**परिक्षेचा दिनांक- १७/ ०६/२०१६**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यानी दिनांक ३०/१०/२०१५ रोजी राज्यस्तरीय गट ब संवर्ग अंतर्गत नागपूर विभागातील नगरपरिषदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर केलेला आहे. उक्त् सुधारित आकृतीबंधानुसार नागपूर विभागातील नगरपरिषदांमध्ये राज्यस्तरीय गट क संवर्गातील श्रेणी ब अंतर्गत रिक्त असलेल्या पदांचा आढावा घेवून उक्त् पदे भरण्याच्या निर्णय घेण्यात आलेला आहे. नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रनपप्रसं २०१५/प्रक्र.११४/२०१५/कक्ष ६/४३१ दिनांक २२/२/२०१६ अन्वये राज्य संवगापदे भरण्यासाठी मान्यता प्रदान केलेली आहे.

ही पदे विभागीय निवड समितीद्वारा भरण्यात येत आहे. खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पध्दतीने लेखी स्पर्धा परिक्षा घेण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येतील.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य),नगर अभियंता (स्थापत्य) | ०५ |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (संगणक) | ०२ |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (विदयुत) | ०२ |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (पाणी पूरवठा,जलनिस्सारण,स्वच्छता अभियंता) | १६ |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा | १६ |
| ६ | महाराष्ट्र नगरपरिषद करनिर्धारण व प्रशासकीय सेवा (उपमुख्याधिकारी) | ०६ |

**परिक्षेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज करण्याचा दिनांक | दिनांक १८ मे २०१६ ते २८ मे २०१६ |
| २ | चालान भरण्याचा शेवटचा दिनांक | ३१ मे २०१६ |
| ३ | प्रवेशपत्र ऑनलाईन करणे | ९ जुन २०१६ |
| ४ | परिक्षेचा दिनांक | १७ जुन २०१६ |
| ५ | उत्तर तालिका प्रसिध्द करणे | १९ जुन २०१६ |
| ६ | प्रश्न व उत्तरावर आक्षेप नोंदविणे | २१ जुन २०१६ पर्यत |
| ७ | गुणवत्ता प्रसिध्दी | ३० जुन २०१६ |

उक्त परिक्षा ही नागपूर मुख्यालयी जिल्हा नागपूर येथेऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. उक्त पदाकरीता ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख २८ मे २०१६ असून ऑनलाईन व्यतीरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाही.

२) वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात वाढ किंवा घट करण्याचे अधिकार विभागीय निवड समिती नागपूर यांना राहतील. व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

३) प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

४) जे उमेदवार अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करतील त्यांना या निवड प्रक्रीयेतील निवडीचा पुढील सर्व टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल.

५) निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यातील वाद व तक्रारी बाबत निर्णय घेण्याचा अधिकार विभागीय निवड समिती नागपूर यांना राहतील. व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

६) उपलब्ध पदसंख्या :- ४७

१) **महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य),नगर अभियंता (स्थापत्य)**
**वेतन श्रेणी -९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- = पदसंख्या – ०५**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेडाळू | अपंग | |
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | वि.जा-अ<br>भ.ज.-ब<br>भ.ज.-क<br>भ.ज.-ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | **५** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **५** |

२) **महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (संगणक)**
**वेतन श्रेणी -९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- = पदसंख्या – ०२**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेडाळू | अपंग | |
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | वि.जा-अ<br>भ.ज.-ब<br>भ.ज.-क<br>भ.ज.-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | **०२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |

३) **महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (विदयुत)**
**वेतन श्रेणी -९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- = पदसंख्या – ०२**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेडाळू | अपंग | |
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | वि.जा-अ<br>भ.ज.-ब<br>भ.ज.-क<br>भ.ज.-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | **०२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |

४) महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (पाणी पूरवठा,जलनिस्सारण,स्वच्छता अभियंता)
वेतन श्रेणी -९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- = पदसंख्या – १६

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेडाळू | अपंग | |
| १ | अनु.जाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | वि.जा-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भ.ज.-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भ.ज.-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज.-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | इ.मा.व. | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ५ | खुला | ८ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| | एकूण | १६ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ११ |

५) महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा व लेखापरिक्षक
वेतन श्रेणी -९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- = पदसंख्या – १६

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेडाळू | अपंग | |
| १ | अनु.जाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | वि.जा-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भ.ज.-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भ.ज.-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज.-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | इ.मा.व. | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ५ | खुला | ८ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| | एकूण | १६ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ११ |

६) **महाराष्ट्र नगरपरिषद करनिर्धारण व प्रशासकीय सेवा (उपमुख्याधिकारी)**
**वेतन श्रेणी -९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- = पदसंख्या – ०६**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | **समांतर आरक्षण** | | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | अपंग | |
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | वि.जा-अ<br>भ.ज.-ब<br>भ.ज.-क<br>भ.ज.-ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | खुला | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | **एकूण** | **६** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **५** |

७) वि.जा.(अ) ,भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),वर्गवारीसाठी आरक्षीत असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षीत पदांसाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदयावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीचा उमदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यांत येईल.

७.१) महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ/२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ नंतर आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

७.२) समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६अ, दिनांक १३ ऑगष्ट २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

७.३) **जात प्रमाणपत्र** - उमेदवाराला ज्या जाती संवर्गाचा लाभ घ्यावयाचा आहे त्या जात संवर्गाचे लागू असलेले जात प्रमाणपत्र अर्ज भरण्याच्या दिनांकापुर्वीचे असणे आवश्यक आहे.

७.४) **जात वैधता**-जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११अन्वये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याच्या पोहोच पावतीची प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील व उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

**७.५) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन**-सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००-प्र. क्र.१७ (२०००) / १२, दि.२८ मार्च २००५नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहीत करणारे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदी व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००० / प्र. क्र. १७ / २००० / १२, दिनांक १ जुले,२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे अर्जदाराने विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन साध्या कागदावर हस्तलिखीत/टंकलिखीत करुन प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचे वेळी सादर करणे अनिवार्य आहे. अविवाहीत अर्जदारांनीही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन पडताळणीच्यावेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**८) वेतनश्रेणी :- १) महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य),नगर अभियंता (स्थापत्य)**
**रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते.**
**२) महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (संगणक)**
**रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते**
**३) महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (विदयुत)**
**रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते**
**४) महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (पाणी पूरवठा, जलनिस्सारण, स्वच्छता अभियंता)**
**रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते**
**५) महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा**
**रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते**
**६) महाराष्ट्र नगरपरिषद करनिर्धारण व प्रशासकीय सेवा (उपमुख्याधिकारी)**
**रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते**

**९) पात्रतेच्या अटी :-**

९.१) गुणवत्ता यादीमध्ये नाव येण्याकरीता लेखी परिक्षेमध्ये किमान ४५ % गुण मिळणे आवश्यक आहे.

९.२) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दिनांक २७ जून, २०११ नुसार अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

९.३) दिनांक १ मे २०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असावी व ३८ वर्षे पूर्ण केलेले नसावे.

**९.४) उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-**

१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यत. (वयाच्या ४३ वर्षापर्यत)
२) अपंग उमेदवारांसाठी यांचेसाठी वयाच्या ४५ वर्षापर्यत..
३) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.
४) वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एक सवलत (अधिकतम) लागू होईल.

१०) किमान शैक्षणिक अर्हता :-

| अ.क | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य),नगर अभियंता (स्थापत्य) | (i) मान्यता प्राप्त विदयापिठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी<br>(ii) माहिती व तंत्रज्ञान विज्ञानाचे शा.नि.दि.४/२/२०१३ मध्ये नमुद संगणक अहर्ता<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (संगणक) | (i) मान्यता प्राप्त विदयापिठाची संगणक अभियांत्रीकी पदवी<br>(ii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (विदयुत) | (i) मान्यता प्राप्त विदयापिठाची विदयुत अभियांत्रीकी पदवी<br>(ii) माहिती व तंत्रज्ञान विज्ञानाचे शा.नि.दि.४/२/२०१३ मध्ये नमुद संगणक अहर्ता<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा(पाणी पूरवठा, जलनिस्सारण, स्वच्छता अभियंता) | (i) मान्यता प्राप्त विदयापिठाची मेकॅनिकल/ पर्यावरण अभियांत्रीकी पदवी किंवा<br>(ii) पर्यावरण विज्ञान (मास्टर डिग्री)<br>(iii) माहिती व तंत्रज्ञान विज्ञानाचे शा.नि.दि.४/२/२०१३ मध्ये नमुद संगणक अहर्ता<br>(iv) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा व लेखापरिक्षक् | (i) बी.कॉम आणि मेंबर ऑफ इंन्स्टीटयूशन ऑफ कॉस्ट अॅन्ड वर्क्स अकाऊंटस किंवा सनदी लेखापाल ( Chartered Accountant)<br>(ii) माहिती व तंत्रज्ञान विज्ञानाचे शा.नि.दि.४/२/२०१३ मध्ये नमुद संगणक अहर्ता<br>(iii) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान |
| ६ | महाराष्ट्र नगरपरिषद करनिर्धारण व प्रशासकीय सेवा (उपमुख्याधिकारी) | (i) कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि<br>(ii) खालील पैकी एका शाखेत पदव्युत्तर (मास्टर डिग्री )<br>a) समाजकार्य<br>b) लोकप्रशासन<br>c) नगर व ग्राम नियोजन<br>d) राज्यशास्त्र<br>e) विधी<br>f) वाणिज्य<br>g) व्यवसाय व व्यवस्थापन<br>h) कोणत्याही शाखेतील अभियंता<br>(iii) माहिती व तंत्रज्ञान विज्ञानाचे शा.नि. दि. ४/२/२०१३ मध्ये नमुद संगणक अर्हता<br>(iv) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान |

१०.१) **मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक :** माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना तदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०.२) **उपरोक्त नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी धारण केलेली असणे अनिवार्य आहे. त्यानंतरच्या दिनांकाची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.**

११) शुल्क :-

| | |
|---|---|
| **१२.१ अमागास** | :- रु. ५००/- |
| **१२.२ मागासवर्गीय** | :- रु. २५०/- |

१२) **अर्ज करण्याची पध्दत :-**

१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने दिनांक २८/ ०५/२०१६ पर्यत स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक १८ /०५ /२०१६ ते दि. २८/०५/२०१६ या कालावधीतच http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर "Apply Online"या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register)या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली तुमचा लॉगिन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. याची प्रिंट काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:च्या अद्यावत फोटो (रुंदी ३.० से.मी x उंची ४.५ से.मी ) व स्वत:ची स्वाक्षरी ( रुंदी ३.० से.मी. x उंची २.५ से.मी ) आणि ३०० DPI Resolution आणि ५० KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे ( टिप – फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी ) प्रवेशपत्रावर / अर्जावर दुस-याचा फोटो / स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सुचना

http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील. अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केन्द्राव्दारे भरता यईल. महा ऑनलाईन लि. या संस्थेकडून प्रत्येक जिल्हयात महा ई-सेवा केन्द्र उघडण्यात आलेले आहे. या महा ई-सेवा केन्द्राची यादी http://mahaonline.gov.in किंवा http://maharecruitment. mahaonline. gov.in या संकेतस्थळावर उपलब्धआहे.

उमेदवाराने यापूर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केले नसल्यास उमेदवारास नविन वापर कर्ता नोंदणी वर क्लिक करुन युझर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

त्यानंतर उमेदवारास "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जाऊन स्वत:ची संपूर्ण भरावी लागेल http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर या पूर्वी प्रोफाईल निर्मिती

मध्ये जाऊन स्वत:ची माहिती भरलेली असल्यास पुन्हा भरावयाची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल माहिती कधीही अद्यावत करु शकतो.

उमेदवाराने युजर नेम व पासवर्ड ची नोंद करुन लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंक वर क्लिक करावे. त्या कार्यालयांतर्गत उपलब्ध जाहीराती "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या संदेशासह दाखविल्या जातील.

क्लिक केल्यानंतर आपण जाहीरातीत नमूद शैक्षणीक पात्रता /अनुभव / इतर बाबींची पूर्तता करीत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

ज्या उमेदवारांना इंटरनेट व्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल, असे उमेदवार महा ई-सेवा केन्द्रा मार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व रुपये २२.९१ ऐवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती (Receipt) महा ई-सेवा केन्द्रा तर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो /स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केन्द् चालकाकडून आकारली जाईल. स्वत: ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार कार्यालयाने निश्चित केलेले परिक्षा शुल्क खालील पध्दतीने भरु शकतील.

**१३. परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा:-**

१. उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेत चालान व्दारे, नेट बँकींग, डेबिट कार्ड/ क्रेडीट कार्ड परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खालील पध्दतीचा अवलंब करावा.

२. युजर नेम व पास वर्ड ची नोंद करुन लॉग इन केल्यांनतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे. (२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल. त्या ठिकाणी "pay Now" अशी लिंक

उपलब्ध् असेल (३) "pay Now" या लिंक वर क्लिक केल्यांनतर दोन पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाव्दारे (४) उमेदवार क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बॅंकींच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही, अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकापुर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. (५) उमेदवाराने चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध् होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बॅकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. (६) चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त् नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरतांना परिक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील. (७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया/ ॲक्सिस बँक (State Bank of India/ Axis Bank) या बँकांच्या

विहीत मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील व याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवावी.

**किंवा**

४. उमेदवारांनी इंटरनेट बँकिंग अथवा क्रेडिट / डेबिट कार्ड द्वारे त्यांच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क विहित मुदतीच्या आत भरावे.

५. फी भरल्यानंतर उमेदवाराने "अर्ज भरा"या लिंकवर क्लिक करुन, आपला उर्वरित अर्ज भरुन पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वत:चा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.

६. विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपूर्वक भरावा.

**१४. परिक्षा केंद्र :-**

१. परिक्षा केंद्र नागपूर येथे राहील.

२. प्रस्तुत परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

१५. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना).

१६. विहित पध्दतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची कार्यवाही उमेदवाराने संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेत दिनांक २४ /०५ / २०१६ पर्यंत करणे आवश्यक आहे.

१७. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

**१८. परीक्षेचे स्वरुप:-**

| अ. क्र | संवर्ग | परीक्षेसाठीचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | मराठी/गणित/बुध्दीमत्ता चाचणी/इंग्रजी/सामान्यज्ञान | स्थापत्य/संगणक/विदयुत/मेकॅनिकल/ पर्यावरण/लेखापाल विषयासंबंधीचे प्रश्न | एकूण गुण |
| १. | **महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य)** | १२० (६० प्रश्न) | ८० (४० प्रश्न) | २०० |
| २. | **महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा** | १२० (६० प्रश्न) | ८० (४० प्रश्न) | २०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा विदयुत | १२० (६० प्रश्न) | ८० (४० प्रश्न) | २०० |
| ४. | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा(पाणी पूरवठा, जलनिस्सारण, स्वच्छता अभियंता | १२० (६० प्रश्न) | ८० (४० प्रश्न) | २०० |
| ५. | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा | १२० (६० प्रश्न) | ८० (४० प्रश्न) | २०० |
| | | मराठी/गणित/बुध्दीमत्ता चाचणी/इंग्रजी | सामान्यज्ञान | एकूण गुण |
| ६. | कर निर्धारण व प्रशासकीय सेवा | ८० (४० प्रश्न) | १२० (६० प्रश्न) | २०० |

१. परीक्षेसाठी मराठी, गणित, बुध्दीमत्ता चाचणी, इंग्रजी, व सामान्यज्ञान या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान राहील. प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे असतील.

२. सामान्यज्ञान पदवि / पदविका परीक्षेच्या दर्जासमान राहील. सदरहू सामान्यज्ञान परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.

३. उपरोक्त २०० गुणांच्या ऑन लाईन पध्दतीने होणा-या लेखी परीक्षेसाठी एकत्रितपणे २ तासांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

१९. **विशेष सुचना :-**

अ) प्रवेशपत्र उमेदवाराने स्वत: डाऊनलोड करावयाचे आहे.
ब) ऑनलाईन स्वरूपात निर्देशीत परीक्षा केंद्रावरच परीक्षा होईल.
क) प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्र व वेळ नमुद राहील.

ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात
२०. तफावत असल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा
उमेदवाराने मागितलेले सामाजिक/ समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिल करणे इत्यादी बदल/ सवलती
नामंजूर करण्यात येतील.

२१. गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भुत उमेदवारांसाठी कागदपत्रे पडताळणी कार्यक्रम प्रसिध्द केला जाईल. अशा
उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार त्यांना कागदपत्रे छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास
वेळेवर स्वखर्चाने ठरवून दिलेल्या ठिकाणी मुळ कागदपत्रे व साक्षांकीत प्रतीसह व्यक्तीश: उपस्थीत राहणे
अनिवार्य राहील. सदर दिवशी, विहीत वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्रे छाननीसाठी अनुपस्थित
राहील्यास, अथवा अपुरे कागदपत्रे सादर केल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल. या बाबत कोणतीही
[illegible] जाणार नाही. तसेच कागदपत्रे पडताळणी प्रक्रीयेअंती सादर केलेली कोणतीही

वरीलप्रमाणे गुणवत्ता यादीतील उमेदवारांची कागदपत्रांच्या छाननी नंतर गुणसंख्येच्या आधारे अंतीम निवडयादी तयार केली जाईल.

सदर जाहीराती संदर्भात काही अडचण असल्यास उमेदवार महाऑनलाईनचे दुरध्वनी क्रमांक ०२२-६१३१६४११ या हेल्प लाईनवर संपर्क करू शकतात.

अनूप कुमार

आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगर पालिका प्रशासन
तथा अध्यक्ष,
विभागीय निवड समिती नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : / /२०१६

- परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
- प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रीयेसाठी अपात्र केले जाईल.